नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०६/०९/२०२५ ( शनिवार )**

---

## नागपूर ग्रामीण जिल्हयातील गणेश विसर्जन बंदोबस्ताकरीता नागपूर ग्रामीण पोलीस दलाची तयारी

दिनांक ०६/०९/२०२५ ते ०८/०९/२०२५ या कालावधीत सार्वजनिक आणि घरगुती गणपतीचे विर्सजन होणार असुन विसर्जना दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही यासाठी नागपुर ग्रामीण पोलीसांचा कडेकोट बंदोबस्त लावण्यात आला आहे.

नागपुर ग्रामीण जिल्हयात पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत कालीघाट आणि पोलीस स्टेशन मौदा अंतर्गत माथनी घाट येथे मोठया प्रमाणात ग्रामीण आणि शहरी भागातील सार्वजनिक आणि घरगुती गणपतींचे विर्सजन करण्यात येते तसेच सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत गणपती विर्सजन होत असते. गणपती विर्सजन बंदोबस्तात नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व उपविभागिय पोलीस अधिकारी हे आपआपल्या उपविभागात नेमुन दिलेल्या स्ट्रायकींग फोर्स सहीत सर्तक पेट्रोलीग सह आपआपले उपविभागातील संपुर्ण बंदोबस्तावर लक्ष देवुन आहेत. जिल्हा विशेष शाखा नागपुर ग्रामीण यांनी घटक स्तरावर आणि सर्व २१ पोलीस स्टेशन यांनी पोलीस स्टेशन स्तरावर योग्य बंदोबस्त लावला असुन बंदोबस्तासाठी बाहेरून अतिरिक्त पोलीस अधिकारी, राज्य राखीव दलाचे पथक आणि ६५० होमगार्ड मागविण्यात आलेले आहे. सहा उपविभागात ६ विभागीय पेट्रोलींग पथक नेमण्यात आलेले आहे. सावनेर आणि उमरेड येथे दंगा नियंत्रण पथक आणि कन्हान येथे राज्य राखीव दलाचे पथक यांना बंदोबस्ताकामी तैनात केले आहे. विशेष ठिकाणी फिक्स पॉईट लावण्यात आलेले आहे.

विसर्जना दरम्यान कोणताही अनुचित किंवा घातपाताचा प्रकार होवु नये म्हणुन घातपात विरोधी पथक ( बीडीडीएस) ने जिल्यातील गर्दीचे ठिकाण, रेल्वे स्टेशन बस स्टॅड, तसेच

महत्वाचे अशा ठिकाणी तपासणी केली आहे. तसेच नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांद्वारे सोशल मिडीयाचे सतत मॉनिटरींग केले जात असुन सोशल मिडीयावर धार्मीक भावना दुखावणाऱ्या पोस्ट टाकुन जातीय तेढ निर्माण करणा—यांवर कठोर कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल. बंदोबस्ताची पुर्वतयारी म्हणुन दहशतवादी विरोधी कक्ष नागपुर ग्रामीण यांनी जिल्हयात संवेदनशील ठिकाणे , धार्मिक स्थळे, आकाशवाणी केंद्र ,रेल्वे स्टेशन,फार्म हाउस ,लॉजेस ,झोपडपटटी परीसर व इतर महत्त्वाच्या ठिकाणी तपासणी केलेली आहे.तसेच पुर्वतयारी करीता २२ रूट मार्च व १५ ठिकाणी दंगा काबु योजनांचा सराव सुध्दा घेण्यात आला आहे.

विर्सजनाच्या दिवशी नागरिकांच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवण्याकरीता व्हिडीओग्राफी करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. विसर्जना दरम्यान जे कोणी उल्लढबाजी किंवा अनुचित प्रकार करण्याचा प्रयत्न करतील त्यांच्यावर त्वरीत प्रतिबंध घालता येईल. तसेच विर्सजन स्थळी लाईफ गार्ड दिलेले आहे. **विसर्जना स्थळावर स्थानिक प्रशासनातर्फे कृत्रिम तलावे तयार करण्यात आली आहे. गणेश मुर्ती विसर्जन हे नैसिर्गिक नाले आणि तलावामध्ये न करता शासनाद्वारे तयार करण्यात आलेले कृत्रिम तलावामध्ये करणे अनिवार्य आहे.**

**तरी विसर्जन शांततेत पार पाडण्याकरीता मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण यांनी स्वतः सर्व अधिकरी यांच्या बैठक घेतल्या. तसेच महत्त्वाच्या विसर्जन मार्गाची पाहणी केली आणि विसर्जन स्थळावर भेट देवुन पाहणी करून सुचना दिल्या.**





## पोलीस स्टेशन जलालखेडा अकस्मात मृत्यु क्रमांक ३३/२०२५ बाबत...

**पोलीस स्टेशन जलालखेडा** :- जलालखेडा पोलीस ठाणे हद्दीतील खडकी गावात राहणारे प्रशांत बाबाराव खरपकर, वय ५० वर्ष, रा.खडकी ता. नरखेड यांनी त्यांचे शेतात विषारी औषध प्राशन केल्याने त्यांचा दिनांक ३१/०८/२०२५ रोजी मेडीकल कॉलेज नागपूर येथे मृत्यु झाला. पोलीस ठाणे जललालखेडा येथे सदर मृत्यु संबधाने प्राप्त कागदपत्रा वरून अकस्मात मृत्यु क्रमांक ३३/२०२५ अन्वये दिनांक ०१/०९/२०२५ रोजी नोंद करण्यात आला आहे. सदर प्रकरण चौकशीकामी सहायक फौजदार/३२२ पुरूषोत्तम धोंडे पोलीस ठाणे जलालखेडा यांचे कडे देण्यात आली आहे.

सदर अकस्मात मृत्युचें अनुषंगाने चौकशी अंमलदार स.फौ/३२२ पुरूषोत्तम धोंडे हे दिनांक ०१/०९/२०२५ रोजी मृतक यांचे घरी खडकी गावातील पोलीस पाटील सौ. अनीता रविंन्द्र नारनवरे यांचे सोबत चौकशीकामी मृतकचे राहते घरी गेले असता. सदर मृतकचे घरी मृतकाचे विधीचे कार्यक्रम व घरी पाहुण्याची गर्दी असल्याने स.फौ/३२२ पुरूषोत्तम धोंडे हे पोलीस ठाणे येथे परत आले. त्यानंतर दिनांक ०२/०९/२०२५ रोजी  सहायक पोलीस निरीक्षक श्री तुषार चव्हाण, प्रभारी अधिकारी पोलीस ठाणे जलालखेडा यांनी स्वत: मृतकचे राहते घरी जावुन मृतकचे नातेवाईकांना सदर घटनेबाबत विचारपुस केली असता मृतकाचे नातेवाईकांनी सांगितले की, मृतकाने विविध बॅकेतून कर्ज काढले होते. कर्जाचे बोजा वाढत गेल्याने मृतक घरी नेहमी विचारात एकटा राहायचा व घरी चिडचिड करायचा. त्याचेवर असलेल्या कर्जामुळेच त्याने विषारी औषध घेवुन आपले जिवन संपविले.सदर कर्जाचे संबधाने बॅकांना लेखी पत्र व्यवहार केला असता स्टेट बॅक ऑफ इंडिया शाखा जलालखेडा यांचेकडुन मृतकचे नावाने १,६०,०००/-रूपये शेतीचे थकित कर्ज असल्याची माहीती प्राप्त झाली.तसेच इतर बॅकेकडुन माहिती प्राप्त होणे बाकी आहे.

वरील आकस्मात मृत्युचे चौकशीअंती मुतकाने कर्जाचे बोजामुळेच आत्महत्या केली असल्याचे प्रथम दर्शनी चौकशीत दिसुन आल्याने मृतकचे परिवाराला शासनाकडुन तात्काळ आर्थिक मदत व्हावी त्यासंबधाने दिनांक ०४/०९/२०२५ रोजी पोलीस ठाणे जलालखेडा कडुन तहसिलदार ,नरखेड यांना विनाविलंब तात्काळ अहवाल सादर करण्यात आलेला आहे.

# मा. पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांची रामटेक येथील अष्टभुजा गणेश मंदीर आणि लाल बाहादुर शास्त्री गणेश मंडाळाला भेट

दिनांक ०६/०९/२०२५ रोजी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत **अष्टभुजा गणेश मंदीर आणि लाल बाहादुर शास्त्री गणेश मंडाळाला** भेट दिली. सदर भेटीदरम्यान मा. पोलीस अधिक्षकांनी गणेश मंडळाचे पदाधिकारी यांच्यासोबत संवाद साधून त्यांना कायदा व सुव्यवस्था अबाधित राखुन शांततेत गणेश विसर्जन करण्याबाबत सुचना दिल्या. सदर वेळी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, यांच्यासह श्री रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक उपविभाग, पोलीस निरीक्षक श्री रविंद्र मानकर , प्रभारी पोलीस स्टेशन रामटेक, पोलीस स्टेशन रामटेक चे अधिकारी /अंमलदार हजर होते.





## अवैधरित्या रेतीचे उत्खनन करून चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, २ आरोपी अटक
## उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर** :— दिनांक ०५/०९/२०२५ रोजी श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा पाटणसांवगी येथे धापेवाडा रोड वरील कोलार नदी संगम पात्रात अवैधरित्या रेतीचे उत्खनन करून ट्रक्टर मध्ये भरून चोरी केली जात आहे. अशी माहीती प्राप्त होताच श्री सागर खर्डे यांनी सावनेर येथील अधिकारी आणि अंमलदार यांना सदर ठिकाणी जावुन कारवाईचे आदेश दिले. पोलीसांनी मौजा पाटणसांवगी येथे धापेवाडा रोड वरील कोलार नदी संगम पात्रात जावुन पाहणी केली असता ट्रॅक्टर क्र. एम एच ४० एल ४९१९ आणि ट्रॅक्टर क्र. एम एच ४० एल ४२२८ मधील ट्रॉली मध्ये काही इसम रेती उत्खनन करून रेती भरत होते. पोलीसांनी शिताफिने दोन अरोपीतांना पकडले. आरोपी क्रमांक १) ट्रक्टर क्रमांक एम. एच. ४० एल. ४९१९ चा चालक अमोल वासुदेव रंगारी, वय ४० वर्ष, रा. वार्ड नं. १ महादुला ता.

पारशिवणी जि. नागपुर, २) ट्रॅक्टर क्र. एम. एच. ४० एल. ४२२८ चा चालक वासुदेव दशरथ सिरसाम, वय ३८ वर्ष, रा. वार्ड नं. १ पाटनसांवगी ता. सावनेर हे मिळुन आले त्यांना परवान्याबाबत विचारपुस केली असता त्यांनी कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले तसेच वाहन मालकाचे नावे विचारले असता त्यांनी आरोपी क्रमांक ३) ट्रॅक्टर क्र. एम एच ४० एल ४९१९ चा मालक राजु गुणाजी शेंडे, वय ४३ वर्ष, रा.वार्ड नं. ५ पाटनसांवगी ता. सावनेर आरोपी क्रमांक ४) ट्रॅक्टर क्र. एम एच ४० एल ४२२८ चा मालक राजेश शंकर कावळे, वय ४८ वर्ष, रा. वार्ड नं. २ पाटनसांवगी ता. सावनेर, अशी माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक्टर क्रमांक एम. एच. ४० एल. ४९१९, ट्रॅक्टर क्रमांक एम. एच. ४० एल. ४९१९ आणि १.०८ ब्रास रेती असा एकुण ८,०३,५०० /— रूपयेचा माल जप्त केला आहे.

नमुद ट्रॅक्टर चालक आणि मालक याच्या विरूध्द पोस्टे सावनेर येथे कलम ३०३ (२), ३(५) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. **चालक आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.**

## अवैधरित्या देशीदारू, मोहाफुल दारू बाळगणाऱ्या,व्रिकी, वाहतुक तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांवर,नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई, २३ गुन्हे नोंद एकुण १,३१,५६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

नागपुर ग्रामीण जिल्हयात **दिनांक ०५/०९/२०२५** रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री, वाहतुक आणि सेवन करणाऱ्यांवर छापा टाकुन **देशी दारू, मोहाफुल दारू आणि वाहन असा एकुण १,३१,५६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**पोलीस स्टेशन कन्हान** येथे आरोपी नामे पियूष अजित शेन्डे, वय २३ वर्षे, रा. वार्ड क्र. ०४ न्यू मार्केट कन्हान, ता. पारशिवनी, जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी नामे १) ज्ञानेश्वर मोतीराम काटे, वय ४१ वर्ष, रा. मेढला ता. नरखेड ,२) पुरूषोत्तम देविदास कोसरे, वय ३५ वर्षे, रा. महाजनपुर (साखरखेडा) ता नरखेड, ३) सुरेश टिपु टेकाम, वय ५६ वर्षे, रा. सिंजर ता नरखेड, ४) सुभाष जयराम सातपुते, वय ३२

वर्षे, रा. मेंढला ता नरखेड याचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी आझादसिंग प्रेमसिंग भादा, वय ५५ वर्ष, रा.खंडाळा ता. काटोल आणि दोन महीला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन भिवापुर** येथे आरोपी नामे १) कपील हंसदास गेडाम, वय ३०वर्ष, रा गाळेघाट तास कॉलनी, भिवापुर जि नागपुर, २) बंडु पांडुरग खंगार, वय ५५वर्ष, रा मोखेबोर्डी, ता. भिवापुर, जि. नागपुर, ३) महेंद्र देवाजी गजभिये, वय ६० वर्ष, रा. माननोरा, ता. भिवापुर, जि. नागपुर याचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी नामे सुभाष लक्ष्मण डाहाके, वय ६१ वर्षे, रा कन्वहा उमरेड याचेवर गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे दोन महीला आरोपी यांचे वर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी नामें रोशन नारायण देशमुख, वय ३२ वर्ष,रा. ५ केळवद आणि दोन महीला आरोपी याचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे १) छत्रपाल शंकर पूरी, वय ६० वर्ष,रा.निमतलाई ता.सावनेर जि.नागपुर आणि एक महीला आरोपी याचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे आरोपी नामे १) पार्थ शामप्रसाद घोशाल, वय ४३ वर्षे, रा भारकस ता हिगणा जि नागपुर,२) मानसिंग मानकसिंग टाक, ४० वर्ष, रा.गंगापुर झोपडपटटी,टाकळघाट, यांचेवर प्रत्येकी गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी नामे कुनाल पांडुरंग काळे, वय २५ वर्षे, रा. वडधामना नगर ह.मु. धुनधाबा सोनेगाव,यांचेवर गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी नामे रमेश रामउद्गार महतो वय ३५ वर्षे रा. मौजा चंचलहसनपूर मिरपूर जि. समस्तीपूर (बिहार) ह.मु दुधाशिवार न्यु एमआयडीसी ता. जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद आहे अशा आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये २३ गुन्हे दाखल केले आहे.

## नागपुर ग्रामीण जिल्हयातील ६४१ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ०६/०९/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६४१ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बोरी येथे २९आरोपी , ,पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३० आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे ३२ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २८ आरोपी अशा एकुण १२२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे २६ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २४ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी अशा एकुण ११४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे २६ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे ३४ आरोपी अशा एकुण ६० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे २९ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३५ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २९ आरोपी अशा एकुण १२२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ३३ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ३७ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३१ आरोपी अशा एकुण १३१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ६४१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**






नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने